# ॥ पाचूचं बेट ॥

-प्रल्हाद जाधव

या एकांकिकेतील पात्रे :

1. चिमणी
2. लता
3. यमू
4. आशा
5. मीना
6. गुरूजी

या एकांकिकेचा कोणत्याही माध्यमातील, कोणत्याही भाषेतील प्रयोगापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

(पाच मुली प्रेक्षकांकडे तोंड करून अर्धवर्तुळाकृती बसलेल्या आहेत. निश्चल. पुतळ्यासरख्या. पडदा उघडत असताना सोसाट्याचे वादळ सुरू होते. विजांचा कडकडाट आणि लखलखाट. एक मोठं वादळ झपाटल्यासारखं निघून जातं. मग स्वच्छ प्रकाश येऊ लागतो. दरम्यान सर्वजणींनी मिळून गाणं सुरू केलं आहे.)

सर्वजणी : ओठावरी बोल आले कधी गाण्याचे,
पाण्यामधी चिंब भिजे बेट पाचूचे...
पाचूच्या या बेटावरी कोण भिरभिरे,
पाखराची फडफड काळजात भरे...
पाखराच्या पंखा वरी माहेराची साय,
बावरल्या पाडसाची हंबरते माय...
गाव कोठे गुरूजींचा, कोण्या देशी गेले,
अंगणात मोगऱ्याचे ओलावले डोळे...

(एका बाजूने वेडसर दिसणारा एक माणूस येतो. अंगात जीर्ण सदरा, धोतर, चष्मा. खूपच भकास. नजर हरवलेली. वय 60 वर्षाच्या आसपास. दुडक्या चालीने दुसऱ्या भागाकडे चालू लागतो इतक्यात सर्व मुली एकदम “अय्या, गुरूजी आले. गुरूजी आले” असा गोंगाट करतात. धावत त्याला गाठतात. त्याच्याभोवती कडे करतात आणि “गुरूजी, गुरूजी” अशा हाका मारायला लागतात. त्याला काही आठवत नाही.)

गुरूजी : नाही, नाही. मी गुरूजी नाही. मी गुरूजी नाही... गुरूजी नाही मी...
(त्यांच्यातून निसटण्याचा प्रयत्न करतो. पण मुली त्याला अडवतात.)

चिमणी : असं काय करता गुरूजी. तुम्हाला काहीच आठवत नाही?

यमू : अगदी काहीच आठवत नाही गुरूजी?

लता : तुम्ही आम्हाला शिकवलंत...

मीना : आम्हाला खेळवलंत...

आशा : आम्हाला वेळोवळी मदत केलीत...

चिमणी : जरा आठवण्याचा प्रयत्न करा गुरूजी.

यमू : तुम्हाला आठवतो तो पहिला दिवस, तुम्ही इथे आला तेव्हांचा —

लता : तुम्ही या इथे असे उभे होतात आणि आम्ही इकडे अशा आट्यापाट्या खेळत होतो... (बोलता बोलता ती त्याला त्या जागी उभा करते. सर्व

मुली खेळण्याच्या पवित्र्यात उभ्या राहतात. तो मागचा प्रसंग जिवंत होऊ लागतो.)

मीना,यमू : (एकदम गोंधळ करत) ए आता माझी पाळी आहे. माझी पाळी आहे.

लता : नाही, नाही. माझी पाळी आहे. (इत्यादी गोंधळ करू लागतात.)

मीना : ए पण असं काय करता तुम्ही? खरंतर माझीच पाळी आहे आता.

आशा : ए पण यमूच्या आधी तूच खेळलीस ना? ते काही नाही आता माझी पाळी आहे. वाटल्यास चिमणीला विचारा. हो की नाही गं चिमणे?

चिमणी : हे पहा अशा उगाच भांडू नका, आणा तो बच्चू इकडे. (एकजण बच्चू आणून देते) हे बघा माझा पहिला नंबर होता. दुसरी लता. तिसरा मीनाचा, चौथी आशा आणि पाचवी यमू. चौथी आशा खेळली. त्यातुळे आता यमूचा नंबर आहे. यमू हा घे बच्चू आणि खेळ.....

(आशा सोडून सर्वजणींना हे पटतं. यमू खेळायला सुरवात करते. आट्यापाट्यांकडे पाठ करून बच्चू टाकतो नेमका एका इयत्तेत पडतो. तिथे घर करते आणि बच्चू चिमणीच्या हातात देते. चिमणी खेळायला येते. बघते तर तिला घरच राहिलेलं नसतं. सगळी घरं भरलेली.)

चिमणी : (रडवेली होत) अय्या पण हे काय? मला घरच नाही राहिलं. आम्ही नाही जा ऽऽऽ

आशा : बरं झालं चांगली खोड मोडली. (सर्वांना) हो की नाही ग?

: (सर्वजणी गोंगाट करत. ए चिमणीला घर नाही, चिमणीला घर नाही. असं तिला चिडवायला लागतात. नाचत नाचत चिमणीच्या मागे येऊन उभ्या राहतात. इतक्यात साऱ्याचं लक्ष गुरूजींकडे जातं तेही टक लावून त्यांच्याकडे बघत आहेत. हळूहळू चिमणीही नजर वर करून त्यांच्याकडं बघते. या आगंतुक पाहुण्याविषयी त्यांच्या मनात थोडी नाराजी, थोडं कुतुहल)

गुरूजी : (हळूहळू पुढं येतात. चिमणीच्या डोक्यावर व पाठवरून मायेनं हात फिरवीत) चिमणे, तुला तर फक्त खेळातलं घर नाही. पण मला मात्र अगदी खरंखुरं घरसुद्धा नाही. पण मी काही नाराज नाही झालो तुझ्यासारखा. रडून घर मिळणार आहे थोडंच? नाही ना? मग आता हास पाहू थोडी. हास. (स्वत: हसतमुख, खिशातून एक पॉपिन्सचा रोल काढतात. तिला एक गोळी देतात.) हं, ही घे गोळी. (नंतर प्रत्येकीला नावानीशी) यमू ही तुला. आशा. लता. हं. आणि मीना (देतात) शाब्बास.

(सर्व मुली भारावलेल्या) बरं का मुलींनो, तुम्ही चिमणीला चिडवलंत पण घर नसल्याचं किंवा सुटण्याचं दु:ख तुम्हालाही समजणार आहे एक दिवस हे लक्षात ठेवा... नवऱ्याच्या घरी जाताना. (सर्वजणी हसतात)

आशा : पण तुम्हाला नावं कशी काय आमची सर्वजणींची ठावूक?

गुरूजी : शंका अगदी रास्त आहे बरं का तुझी आशा. पण मी शिक्षक आहे म्हटलं.

यमू,लता : (चमत्कारिकपणे बघत) शिक्षक?

गुरूजी : का? असं चमकारिकपणे बघायला काय झालं. शिक्षक म्हणजे काय शिंग आणि सुळे असणारा राक्षस वाटला की काय तुम्हाला?

मीना : म्हणजे ते तिरमारे गुरूजी बदलून गेले त्यांच्या जागी आलात की काय तुम्ही ?

गुरूजी : अगदी बरोबर ओळखलंस मीने. पण तुझ्या बोलण्यावरून ते तिरमारे म्हणजे...

मीना : त्याच्यापेक्षा शिंग आणि सुळे असलेला राक्षक परवडला असता...

गुरूजी : अं हं.. (हात जोडत) गुरूर्देवो भव! चुकले म्हण... चुकले म्हण.

मीना : (तशीच बेडरपणे उभी)

गुरूजी : नाही म्हणत? असं असेल तर मग मला शिक्षा करावी लागेल. आणि माझी शिक्षेची पद्धत वेगळी आहे. मुलांना नाही शिक्षा करत मी. तर स्वत:लाच करून घेतो. तू जर चुकली म्हणाली नाहीस तर...

लता : (हळूच) ए म्हण ना?

मीना : चुकले मी.

गुरूजी : शाब्बास! असंच जर सहकार्य दिलंत ना तर शिकवताना खूप आंनद होईल मला. आणि तुम्हला तर माझ्याही पेक्षा खूप आंनद होईल...

चिमणी : (काळजीने) पण गुरूजी मघाशी तुम्ही म्हणालात की तुम्हाला घर नाही म्हणून, मग आता रहाणार कुठं तुम्ही?

गुरूजी : (हसत) त्या तिरमारे गुरूजींचं घर आता खाली झालं असणार. तिथंच राहणार मी. दाखवणार ना मग ते मला?

सर्वजणी : (उत्साहाने) हो...

गुरूजी : चला तर मग.

: (सर्वजणी निघतात. मागून गुरूजी. मुलींच्या तोंडी गाणे. गाणे म्हणता म्हणता त्या तशी कृतीही करतात.)

सर्वजणी : शाळेपाशी गुरूजीचे चंद्रमोळी घर,
घरापुढे मोगऱ्याला सदाचा बहर...
मोगऱ्याच्या झाडापाशी आड खोल खोल,
खोल खोल आडामध्ये पाणी खोल खोल...
कुरूकूरू रहाटाची कुरूकूरू गाणी,
डचमळे पोहोऱ्यात निळेशार पाणी...
पाणी शिंपू या गं पाणी शिंपू या,
गुरूजींचे चंद्रमोळी घर झाडू या...
गावावरी उतरली लक्ष्मी वेळ,
जळणाऱ्या वातीमध्ये सुखावले तेल...

(शेवटच्या ओळींसोबत रंगमंचावर अंधार होऊ लागलेला. एकजण तोवर एक पणती लावते आणि गुरूजींच्या घरात ओटीवर ठेवते. सर्वजणी तिच्यामागे. मग शांतपणे सर्वजणी खाली बसतात आणि शुभंकरोती सुरू करतात. गुरूजी एका बाजूला उभे राहून अनिमिषपणे हा सर्व प्रकार पहात आहेत. 'शुभंकरोती'च्या ओळी नकळत त्यांच्याही तोंडून बाहेर पडतात. त्यांचेही हात जोडले जातात.)

सर्वजणी : शुभंकरोती कल्याणंम् आरोग्यं धनसंपदा
शत्रुबुद्धी विनाशाय दीपज्योती नमोस्तुते
दिव्या दिव्या दीपत्कार कानीकुंडल मोतीहार
दिव्यास पासून नमस्कार ।
ये ग लक्ष्मी बैस बाजे, माझे घर तुला साजे
घरातील पिडा बाहेर जावो, बाहेरची लक्ष्मी घरात येवो.
जयजय रघुवीर समर्थ.

मीना : (शुभंकरोती झाल्यावर सर्वजणी निघतात.) आता आम्ही जाऊ गुरूजी?

गुरूजी : (मूक संमती देतात. तत्पूर्वी निरांजनाजवळून एक बशी उचलून प्रत्येकीला साखर देतात. एकेकजण ओळीने साखर घेते आणि रंगमंचाच्या दुसऱ्या भागात म्हणजे शाळेत पाठमोरी जाऊन उभी रहाते.

(गुरूजी भारावल्यासारखे निरांजनाजवळ येतात. निरांजन उचलून हातात घेतात. अगदी चेहऱ्याजवळ आणतात. आता निरंजनाकडे कृतनिश्चयाने पहात राहतात. जणू तो ज्ञानाचा दिवा त्यांना कायम असाच प्रज्वलित ठेवायचा आहे. हळूहळून अंधार.

शाळेच्या घंटेचा घणघण आवाज येऊ लागतो. तसतसा दुसऱ्या भागात प्रकाश उजळतो. मुली गडबड करत वर्गात बसल्या आहेत. हळूहळू गुरूजी वर्गात प्रवेश करतात.)

आशा : एक साऽऽऽथ ऽऽ

इतर : नमस्ते...

गुरूजी : (सर्वत्र पहात) बसा...मुलींनो, आपण शाळेत जे काही शिकतो त्याचा उपयोग प्रत्यक्ष आयुष्यात आपल्याला फारसा होत नाही. पण त्यामुळे आपल्या जीवनाला एक दिशा मात्र मिळते बरं का. मग पुढचं सगळ शिक्षण आपण स्वत:च घ्यायचं असतं. आपणच विद्यार्थी व्हायचं आणि आपणच शिक्षक. आपल्या अवतीभवतीची परिस्थिती, माणसं, घटना यांचा अर्थ लावत जायचा. प्रत्यक्ष अनुभव घेत शिकत जायचं. अनुभव हा सगळ्यात श्रेष्ठ गुरू आहे हे लक्षात ठेवा.

मीना : कुणीतरी चिमटा काढल्यामुळं जोरात किंचाळते) आई गं ऽऽऽ (सगळ्यांचे लक्ष तिच्याकडे.)

गुरूजी : काय झालं किंचाळायला एकदम मीने ?

मीना : (कळवळत) मला....कुणीतरी चिमटा काढला गुरूजी.

गुरूजी : कुणी काढाला चिमटा? मी विचारतोय कुणी काढला चिमटा? (चिडीचूप शांतता. गुरूजी रोखून पहात) आशा...

आशा : (धडपडत उभी रहात) मी नाही काढला गुरूजी. मी नाही काढला.

गुरूजी : मी विचारलं होतं तुला? नाही ना? मग कशाला केलास खुलासा? तुझं मन तुला खात होतं म्हणूनच की नाही? सापडलीस ना? अगं सगळी हयात गेली माझी शिकवण्यात... (आशाच्या डोळ्यात पाणी. ती मान खाली घालते.) रडायला लागलीस तू? (तिच्याजवळ जात.) बरं झालं. मी काही करण्याच्या आत स्वत:च शिक्षा करून घेतलीस तू. चुकीचं परिमार्जन झालं. (तिला थोपटून) बैस. (ती बसते. सर्वांकडे स्मित नजरेने पहात) ती... चिमट्याची गोष्ट माहित आहे ना तुम्हाला ?

सर्वजणी : कसली...कसली ?

गुरूजी : चिमट्याची!

लता : अय्या, चिमट्याची?

चिमणी, मीना : सांगा ना गुरूजी.

गुरूजी : सांगू ?

सर्वजणी : हो ऽऽऽ

गुरूजी : (सुरूवात करत) एक होता, चिमटा.

सर्वजणी : हं...

गुरूजी : (जवळ जात) आणि एक होता घे चिमटा.

सर्वजणी : हं...

गुरूजी : काय होता?

लता : (निरागसपणे) घे चिमटा.

गुरूजी : (तिला चिमटा घेतात)

लता : (गयावया करत) सोडा ना गुरूजी. आई ग ऽऽऽ सोडा ना...

गुरूजी : अगं तूच म्हाणाली ना “घे चिमटा” म्हणून घेतला. (सर्वजणी हसताहेत. तिला सोडतात आणि मिस्किलपणे) पुन्हा सांगू का?

सर्वजणी : (ओरडत) नको नको ऽऽऽ

गुरूजी : मग आता अभ्यास ?

सर्वजणी : सुरू करायचा.

गुरूजी : (तयारीने फळ्यावर खडू ठेवून काहीतरी लिहितात आणि तसेच फ्रीज होतात. सर्वजणी एका आवाजात पुढील सूत्र सुरू करतात. प्रत्येक सूत्र तीन वेळा... शेवटच्या वेळी आवाज कमीकमी व एकदम बंद)

सर्वजणी : आय गो. वुई गो. यू गो. यू गो.
ही, शी, इट गोज. दे गो.
(गुरूजी फ्रीज ॲक्शन सोडून फळा पुसून काढतात. पुन्हा काहीतरी लिहितात आणि मागे मुलींकडे वळून पहातात व फ्रीज.)

सर्वजणी : (वरील प्रमाणेच) उष्णतेमुळे भूगर्भातील पाण्याची वाफ होते. ही वाफ बाहेर येण्यासाठी जमिनीला आतून धडका मारते. त्याचे जे हादरे बसतात त्याला भूकंप असे म्हणतात.
(गुरूजी पुन्हा फळा पुसतात आणि पाठीवर हात टाकून वर्गात येरझारा मारायला सुरूवात करतात. मध्येच बोलण्यासाठी तोंड उघडून फ्रीज होतात.)

सर्वजणी : हळदीघाटाची लढाई महाराणा प्रताप आणि मोगल यांच्यात 1576 साली झाली. या लढाईत महाराणा प्रतापचा पराभव झाला.
(गुरूजी पुन्हा आणखी एक फेरी मारून उलट दिशेला येतात. मुलींकडे पहातात. फ्रीज.)

सर्वजणी : प्रकाशाची गती एका सेकंदाला 1 लक्ष 86 हजार मैल इतकी असते.

(हे सूत्र म्हणत असतांनाच रंगमंचावर हळूहळू अंधार व्हायला लागतो. पूर्ण अंधार व्हायला लागता-लागता शाळेच्या घंटेचा आवाज येऊ लागतो. सर्वजणी उठतात. आता त्यांची तोंडे घरच्या दिशेने. गुरूजी फळ्याशी उभे. घंटा विशिष्ट लयीत वाजतच रहाते. पूर्ण अंधार. शेवटचा ठोका पडतो आणि पुन्हा घंटा विशिष्ट लयीत शाळा भरत असल्याचे दर्शवित वाजायला सुरूवात होते. हळूहळू पूर्ण प्रकाश. घंटेचा आवाज बंद. आता त्या मुलींची तोंडे शाळेच्या दिशेने. प्रत्येकजण "गुरूजी मी आत येऊ?" असे विचारत आत येऊन बसते. गुरूजी सर्वांवरून नजर टाकतात.)

गुरूजी : मुलींनो, आज वार कोणता?

सर्वजणी : गुरूवार.

गुरूजी : शाब्बास! गुरूवार म्हणजे बृहस्पतीचा वार. बृहस्पती हा ज्ञानाचा देव. तर त्याच्या वारी आज आपण सारा वेळ ज्ञान-साधनेत — (अचानक लक्षात येते की चिमणी आलेली नाही.) चिमणी नाही दिसत कुठं ? दोन-तीन दिवस झाले शाळेत आली नाही. (सर्व शांत) अरे मी काय विचारतोय काय?

मीना : (उभी रहात) चिमणी आजारी आहे गुरूजी.

गुरूजी : काय आजारी आहे? आणि मला कसं समजलं नाही मग? (सर्व शांत) अगं गप्प काय बसलात मुखस्तंभारख्या ? मैत्रीण तुमची ती? एका बोटाला लागलं की त्याची कळ दुसऱ्या बोटाला येते हे शिकलो ना आपण? ते पुस्तकातच राहिलं की काय? (सात्विक संतापाने) हे बघा, हे शिक्षण फक्त गुण मिळवण्यापुरतं मर्यादित वाटत असेल तुम्हाला तर शिकुनही तुम्हाला अज्ञानीच म्हणावयास हवं. मला आत्ताच्याआत्ता चिमणीकडे जायचंय. कोण दाखवणार मला तिचं घर?

(सर्वजणी उभ्या राहतात आणि निमूटपणे हळूहळू मार्गाला लागतात. त्यांच्यामागून गुरूजी. रंगमंचावर एका कोपऱ्यात चिमणी पोटात पाय ओढून झोपली आहे. तिच्या उशाशी तिची आजी डोक्याला हात लावून बसली आहे. आजी म्हणजे शक्यतो त्यांच्यातलीच एक मुलगी.)

गुरूजी : (जवळ जात. प्रेमळपणे) चिमणे ऽऽऽ ए चिऊ.

आजी : (डोळ्यावर हात घेऊन निरखून पहात लटलटत्या सुरात) कोण? कोण

आलंय ते?

गुरूजी : आई, मी गुरूजी. समजलं की चिमणी आजरी आहे म्हणून बघायला आलो.

आजी : दोन दिवस झाले. अंगात जाळ भरलाय नुसता पोरीच्या. दोन दिवसात घासभर अन्न देखिल गेलं नाही तिच्या पोटात. त्यात मी ही अशी म्हातारी. दिसतही नाही नीट आताशा. चिमणीचे आई-बाप गेलेत बाहेरगावी. मी एकटी काय करणार रे मास्तरा? पण कशीतरी धडपडत डाक्टराकडं गेल्ये. औषध आणलं पण त्याचा काही फायदा झाला नाही.

गुरूजी : ठीक आहे आई. आता काहीही काळजी करू नका. मी बघतो सगळं. (खाली बसतात चिमणीचं डोक मांडीवर घेतात तोवर इतर मुली. पाणी, कपडा, मीठ इ. गोष्टी आणून देतात. गुरूजी मिठाच्या पाण्याची एकेक घडी चिमणीच्या कपाळावर ठेवून बदलू लागतात. मागे निश्चिल उभ्या राहिलेल्या मुली गाणं सुरू करतात. गाण्यातच रात्र संपून पहाट.)

सर्वजणी : चिमणीची चिवचिव गळ्यात अडली,
गुरूजींच्या हातातली माय जागी झाली...
कशासाठी गुरूजीनी उचलले वाण,
गुरूजींना नियतीने घातलेली आण...
गुरूजीनी चिऊसाठी मांडियले तप,
हळूहळू चिमणीचा उतरला ताप...
पहाटेला चिमणीचा डोळा उघडला,
भूपराग कोंबड्याने कोण्यात छेडला...
(कोंबड्याची पल्लेदार बांग ऐकू येते आणि चिमणी “पाणी...पाणी....” अशी मागणी करते. गुरूजी तिला चमच्याने पाणी पाजतात आणि हळूवारपणे बसती करतात. चिमणीचे गुरूजींकडे लक्ष जाते)

चिमणी : (खोल आवाजात) कोण...गुरूजी?

गुरूजी : (त्यांच्या चेहेऱ्यावर हसू फुललेलं) होय चिऊ होय... आणखी कोणकोण आलंय तुला भेटायला बघ. (इतरजणी तिच्यापुढे येतात आणि तिच्याशी लगट करत तिच्या बाजूला बसतात.) आता लौकर बरी होणार आहेस बरं का चिमणे तू. आणि व्हायलाच पाहिजे तुला बरं, नाहीतर तुझी काळजी घेता घेता ही तुझी आजीही आजारी पडायची...

आजी : (उठत) मी पडले आजारी तरी हरकत नाही. पण चिमणी बरी झाली

पाहिजे. आमचं काय ऱ्हायलं आता. गोवऱ्या गेल्यात कधीच मसणात. तुझी खूप मदत झाली रे मास्तरा. अगदी देवासारखा धावून आलास. रात्रभर चिमणीला मांडीवर घेऊन बसला होतास, अगदी पोटच्या पोरीसारखं...

(गुरूजी चमकतात. एका कटू आठवणीनं त्यांच्या डोळ्यात पाणी तरळतं.)

चिमणी : गुरूजी तुमच्या डोळ्यात पाणी?

गुरूजी : (भानावर येत) छे-छे! काहीतरी गेलं वाटत डोळ्यात. असं मोक्याच्या वेळी डोळ्यात पाणी यायला पाहिजे ते खरं म्हणजे नाटकात. पण त्यावेळी हे 'काहीतरी' कुठं नाहीसं होतं कुणास ठाऊक ! (डोळे टिपतो) नाटकावरनं बरी आठवण झाली. बरं का चिमणे.... स्नेहसंमेलनासाठी आपल्याला नाटक बसवायचं आहे. तुलाही भूमिका करायची आहे मोठी. तेव्हा लवकर खडखडीत बरी हो. रविवारी घरीच तालीम ठेवलीय. येशील ना?

चिमणी : (उत्साहाने) हो ऽऽऽ अगदी नक्की येईन.

(सर्वजणी निघण्यासाठी उठतात. अंधारात गुरूजींच्या घरी. रविवारची संध्याकाळ. मुलीची तालीम जवळजवळ संपत आली आहे. प्रकाश ?)

गुरूजी : हे पहा मुलींनो, तुमचे संवाद अजून नीटसे पाठ झालेले नाही. संवाद जोवर पाठ होणार नाहीत तोपर्यंत अभिनयात जिवंतपणा येणार नाही. पंधरा दिवसावंर आलं नाटक. येत्या रविवारपर्यंत सर्वांचे संवाद पाठ हवेत. त्यादिवशी मी कुणालाही पुस्तक हातात घेऊ देणार नाही, समजलं? आणि हे बघा, एकदा का तुम्ही भूमिकेत शिरायला शिकलात की अभिनय आपोआपच जिवंत होईल आणि संवादही मग उत्स्फूर्तपणे बोलायला लागाल तुम्ही.

लता : गुरूजी, तुम्ही कधी नाटकात काम केलयं?

गुरूजी : खूप नाटकातनं काम केलीत. ट्रेनिंगला होतो तेव्हातर वर्षातून तीनतीन नाटकं बसवायचो आम्ही. मला खूप आवड होती नाटकात काम करायची. (उसासत) आता फक्त आठवणीच उरल्यात त्या दिवसांच्या.

मीना : गुरूजी आम्हाला करून दाखवा ना काहीतरी.

सर्वजणी : (आग्रह करत हो...हो... दाखवाना... "अय्या, दाखवा ना गुरूजी")

गुरूजी : (संकोचत) छे-छे! आता कशाला उगाच...

आशा : ते काही नाही.तुम्ही काही ना काहीतरी करून दाखवलंच पाहिजे. त्याशिवाय आम्ही जाणार नाही इथून.

सर्वजणी : (तिची री ओढत हो...हो... गुरूजी.)

गुरूजी : ठीक आहे. एकदा का तुमचा लाडिक हुकूम झाला की, त्यातून सुटणार आहे मी थोडाच? (जुन्या आठवणीत शिरत) शेक्सपीअरच्या हॅम्लेट या नाटकाचा नानासाहेब फाटकांनी अनुवाद केलाय. ते नाटक बसवलं होतं आम्ही. त्यात मी हॅम्लेटच्या बापाच्या भूताची भूमिका करत असे.

चिमणी : अय्या ऽऽऽ भूताची भूमिका? (खिदळते) खूप गंमत येत असेल ना मग?

यमू : (मिटक्या मारत) अय्या, दाखवा ना गुरूजी, करून...

गुरूजी : (पूर्णपणे बदलत) पहिल्या अंकातील पाचव्या प्रवेशात ते भूत चंद्रसेनाला म्हणतं:

"त्या कपटपटू नराधम नरपशूनं माझ्या सद्‌गुणी राणीला आपल्या कौटिल्यानं आणि वाक्चातुर्यानं जारकर्म करायला प्रवृत्त केलं. चंद्रसेना असं नीच कर्म तिच्या हातून झालं तरी कसं ? विवाहासंबंधी वाहिलेल्या 'नातिचरामी नातिचरामी' या शपथेचं ज्यानं कधी उल्लंघन केल नाही त्या मला सोडून माझ्यापेक्षा प्रत्येक गुणात शंभरपटीने कमी अशा त्या नीचावर ती भाळली त्यात तिनं त्याचे असे कोणते गुण पाहिले? परंतु जी खरी साध्वी आहे तिच्या पातिव्रत्याचा भंग करायला साक्षात देव जरी आला तरी त्याच्यानं ते जसं ढळवणार नाही त्याप्रमाणे स्वभावत:च जारकर्म करण्याकडं जिची प्रवृत्ती अशीचा प्रत्यक्ष देवदूताशी जरी विवाह झाला तरी ती स्वर्गात देखिल व्याभिचार केल्याशिवाय राहणार नाही"

(नाटकातल्या संवादांऐवजी पुढील शब्द अगदी अभवितपणे त्यांच्या ओठावर येतात.)

...पण... पण या वणव्यात होरपळलं एक कोकरू... माझं लाडकं कोकरू. कुठं आहेस तू बेटा-कुठं आहेस? तुझ्या या अभागी बापाला असा संन्याशी करून कोणत्या पऱ्यांच्या देशात रमली आहेस बेटा ? कोणत्या पऱ्यांच्या देशात ? (काही काळ शांतता. नंतर सर्व मुली कडाडून टाळ्या वाजवतात. गुरूजी भानावर येऊन स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करतात.)

चिमणी : वा अगदी छान अभिनय केलात हं गुरूजी.

लता : खरचं भूमिकेत कसं शिरायचं ते दाखवलंत तुम्ही आम्हाला. अगदी

जिवंत अभिनय केलात.

गुरूजी : (विस्कटलेले) तसा मी जगतोय कुठं ? नुसताच अभिनय करतोय.

मीना : म्हणजे काय गुरूजी?

गुरूजी : (आपल्यातच हरवलेले) हा एवढा एक प्रश्न गुरूजींना विचारू नका तुम्ही... हा एवढा एक प्रश्न. (गुढघ्यात मान घालून बसतात. काहीतरी वेगळं घडलंय हे जाणून सर्व मुली ओळीने बाहेर पडतात. अंधार. प्रकाश. स्नेहसंमेलन होऊन गेलं आहे. सर्व मुली आता शाळेमध्ये बसलेल्या आहेत. नेहमीपेक्षा शांतपणे. गुरूजी संथपणे पावले टाकीत शाळेत येतात. त्या धक्क्यातून ते अजून सावरलेले नाहीत. गुरूजी येतात आणि हताशपणे उभे राहतात.)

लता : गुरूजी तुम्हाला बरं वाटत नाही का?

मीना : नाटकासाठी खूप त्रास घेतला तुम्ही.

चिमणी : पण त्यामुळंच तर दरवर्षीपेक्षा कितीतरी चांगला झाला कार्यक्रम. (गुरूजी गप्पच)

यमू : गुरूजी, तुम्ही काही दिवस रजा घेऊन आराम का करत नाही?

आशा : ए नको. त्यापेक्षा माझ्या डोक्यात एक आयडिया आहे. (सर्वजणी तिच्याकडे बघतात) गुरूजी, आपण सहलीला जावूया ! (हो हो गुरूजी खूप चांगली आयडिया आहे. आपण सहलीला जावू या, आणि सहलीला म्हणजे काही फार लांब नाही जायचं. गावाबाहेरचा तो महादेवाचा डोंगर आहे ना तिथं जायचं. डोंगराच्या माथ्यावर शंकराचं देऊळ आहे. एक लहानसं तळंही आहे. वरून गाव काय सुंदर दिसतो आपला. जायचं आणि लगेच परत यायचं. जाऊ या ना? (सर्वजणींचा जोरदार आग्रह

गुरूजी एकदा सर्वजणींकडे पहातात आणि "हो जाऊ या" असे म्हणतात तेव्हा सर्वजणी आनंदाने गोंधळ घालायला लागतात एकजण "डमडम डिगा डिगा" गाणं सुरू करते. सर्वजणी तिला साथ देतात. तर दुसरी "तेरी प्यारी प्यारी सुरतको किसीकी नजर ना लगे चष्मेबद्दूर" म्हणू लागते. 'चष्मेबद्दूर' या शब्दाच्या वेळी ती गुरूजींच्या चष्म्याकडे निर्देश. सर्वच हसतात, गुरूजीही.)

गुरूजी : (हसत) हं चला निघा आता की बसणार इथंच भेंड्या लावत?

(सर्वजणी निघतात. मागून गुरूजी, मुलींच्या तोंडी गाणं. गाण्याप्रामणे

कृती)

सर्वजणी : सहलीचा दिस आला धापा टाकीत,
पायवाट फुल झाली सुरांच्या ओटीत...
रानभर पाखराची झेपावली गाणी,
हसताना गुरूजींच्या डोळा आले पाणी...
पायावरी उतरले आभाळाचे रंग,
दमलेल्या पोरी झाल्या आपल्यात दंग...
देवळाच्या पायरीशी शिणला सोहळा,
आणि कुठे वणव्याने उघडेना डोळा...

(डोंगरावर पोहोचेपर्यंत सर्वजण खूप दमलेले आहेत. धापा टाकीत चालतात. हळूहळू माथ्यावर येतात. आता पाखरांचा चिवचिवाट, रानकिड्यांची किरकिर्र...असे वेगळे वातावरण निर्माण झालेले आहे. वरती पोहचल्यावर मुली "आई गं, अरे देवा देवा" करत आडव्या तिडव्या अस्वाव्यस्त पसरतात. गुरूजीही बसतात.)

चिमणी : (ओरडत) गुरूजी मला भूक लागलेय.

लता : हो गुरूजी मला पण भूक लागलीय. चला डबे खावूया आपण.
(तोवर सर्वजणी डबे उघडतात. गुरूजी त्यांच्यात बसतात. एकजण त्यांच्यासमोर डबा ठेवते. आणि सर्वजणी खाण्यावर तुटून पडतात. गुरूजी सावकाश एक घास उचलतात आणि तोंडात घालतात तोच.)

यमू : गुरूजी तुम्ही लग्न का केलं नाही हो?

गुरूजी : (ठसका बसतो. डोळ्यात पाणी येत. पाणी पितात. डबा तसाच सारून उठतात.)

आशा : का गुरूजी उठलात असे एकाएकी? जेवायचं नाही का तुम्हाला?

गुरूजी : मला काही खावसंच वाटच नाही. तुम्ही खाऊन घ्या. तोवर मी त्या तळ्याच्या काठी जाऊन बसतो. (मुली पुन्हा खाण्यात दंग. गुरूजी हळूहळू तळ्याच्या काठी येतात. मुलींवर अंधार. गुरूजी अस्वस्थपणे काठावर बसतात. अभावितपणे एक खडा उचलून तळ्यात टाकतात. तरंगांचा मोहक आवाज येतो. गुरूजींवर वेगळ्या रंगाचा प्रकाश आणि एकाएकी छुम... छुम...छुम....छुम... असा पैजणांचा विशिष्ट लयीतील आवाज येऊ लागतो. त्याने अस्वस्थ होऊन) हा...हा... नाद कुणाच्या नुपुरांचा? (पुन्हा छुम... छुम...) नुपुरांचे हे विशिष्ट लयीतले पदन्यास

कसे उलगडत चाललेत आठवणींची एक रेशमी लडी आतल्या आत? (तोच बाबाऽऽऽ अशी लाघवी हाक ऐकू येते आणि त्या हाकेच प्रतिध्वनी खोलवर कुठंतरी लुप्त होत जातात. त्याने घायाळ होऊन) कुणाची ही साद? कुणाची?

कुठे आहेस तू बेटा? (बाबाऽऽऽ असे लाघवी उत्तर आणि पुन्हा त्याचे प्रतिध्वनी. त्यांच्या रोखाने सभोवार पहात.) कुठे आहेस तू बेटा...कुठे आहेस? अशी माझ्यासमोर ये, माझ्या पापणीच्या केसातून प्रकाशाची एक लकेर होऊन माझ्या काळजावर उतर बेटा... (एकटक पहात राहतात. तोवर चिमणी तिथवर येऊन पोहोचली आहे)

चिमणी : काय बघताय गुरूजी एकटक तिकडे?

गुरूजी : (तंद्रीतच) ते.. ते.... फुल बघितलस कमळाचं? शुभ्र, प्रफुल्लीत... उतरत्या उन्हाची चंदेरी झिलई पाकळ्यांवर खेळवणारं... पण.. त्याच्या तळाशी वेटोळं घालून बसलेला तो...तो हिरव्या रंगाचा केसाळ पाणसर्प दिसतोय तुला? बघ...बघ कसा पवित्रा घेऊन फुत्कारतोय माझ्याच दिशेनं... (प्रार्थनेचा सूर) हे माझ्या चिरंजीव वेदनेच्या बापा. मी करतो तुझी प्रार्थना. तू तुझा जहरी विळखा काढून घे तिथून आणि माझा मार्ग मला मोकळा कर. ते फुल माझं आहे. ते मला घेऊ दे. (एकदम व्हिमजिकल होत) ते फुल माझं आहे ते मला घेऊ दे... ते फुल माझं आहे, ते मला घेऊ दे. (बोलण्याच्या नादात गुरूजी पाण्यात उतरतात. तोच)

चिमणी : पुढं जाऊ नका गुरुजी. पाणी फार खोल आहे.

(तोवर सर्व मुली तिच्यामागे जमलेल्या असतात. गुरुजींना पाण्यात उतरलेले पाहून त्याही आरडाओरडा करतात. "गुरुजी, मागे फिरा गुरुजी. पाणी खूप खोल आहे गुरुजी" अशी आर्जवे करतात. गुरुजी भानावर येतात. मागे फिरतात. पण काठावर येतांना एका दगडावर पाय सटकून खाली पडतात.)

मीना : अगंबाई सावकाश तोल गेला ना गुरुजी तुमचा !

गुरुजी : होय. माझा तोल गेला, खरंच माझा तोल गेला...

यमू : आणि हे काय गुढघ्यातून चांगलं रक्त यायला लागलं की! (गुरूजी एकदोन पावल लंगडत लंगडत टाकतात.)

आशा : बापरे! खूप लागलं की काय?

गुरूजी : छे...छे... थोडसं खरचटलंय इतकंच.

लता : (सात्विक संतापाने) कसलं खरचटलंय? चांगलं रक्त यायला लागलंय. थांबा... (डोक्याचा रुमाल सोडून त्यांच्या गुढघ्यावर बांधते.) घरी गेल्यावर आपण हळद आणि तुरटीचा लेप लावू. चला आता.

(दोघीजणी आधारासाठी खांदा देतात. त्यांचा आधार घेऊन गुरूजी लंगडत लंगडत चालू लागतात. बाकीच्या मागून... साऱ्यांच्या तोंडी गाणे.)

सर्वजणी : तोल गेला गुरुजींचा सुटले की भान,
गुरूजींच्या पावलाना लेकरांची आण...
उलटली मनामध्ये कमळाची शाई,
हरवल्या पाडसाला साद घाले आई...
सोसताना कळ कसे डोळा पाणी आले,
ओठावरी आसवांचे गूज गाणे झाले...
तोल गेला गुरुजींचा सुटले की भान,
गुरुजींच्या पावलाना लेकरांची आण...

(सर्वजण गुरुजींच्या घरी येतात. गुरुजीना एका जागी बसवतात व काही ना काही कामाला लागतात.)

लता : गुरुजी आता इथून अजिबात हलायचं नाही. मी तुमच्या गुडघ्याला तुरटी आणि हळदीचा लेप लावते.

यमू : गुरुजी, इथे पातेल्यात भात आहे सकाळचा. डब्यात दहीसुद्धा आहे. ते खायचं रात्री झोपतांना.

चिमणी : आणि हे बघा बरं वाटेपर्यन्त शाळेत आला नाही तरी चालेल.

गुरुजी : कशासाठी इतकी माया लावताय पोरींनो या मुशाफिराला?

आशा : का तुम्ही नाही आम्हाला माया लावली? आणि समजा तुमची मुलगी असती तर तिनं नसत का केलं तुमचं?

गुरुजी : (कण्हत) आई गऽऽ परमेश्वराऽऽ

मीना : फार त्रास होतोय कां?

गुरुजी : फार नाही पण हा गुडघा आता हलवता येत नाही.

मीना : म्हणजे गुरुजी, तुम्ही आता शिवाजी महाराज झालात!

गुरुजी : ते कसं काय ग कारटे?

मीना : अहो! त्यांना सुद्धा गुडघेदुखी नव्हती का? (सर्वजण हसतात)

गुरुजी : पण बरं का मीने त्या गुडघेदुखीतच महाराज गेले...

आशा : असं बोलायला नको, अगदीच काही सृष्टीची उलथापालथ झालेली नाही.

मिणी : किंवा मुंग्यांनी मेरुपर्वत गिळलेला नाही.

लता : किंवा वडवानलानं अरबी समुद्र जाळलेला नाही.

गुरुजी : मग आम्हीच असे पाय घसरुन कसे पडलो? (सर्वजण हसतात)

यमू : निघू आता आम्ही?

गुरुजी : मी रहा म्हटलं तरी राहणार आहात थोडंच ? अग सख्ख्या बापाच्या घरीसुद्धा राहणार नाही तुम्ही. पंख फुटले की चिवचिवत उडून जाणार आपापल्या घरट्यांकडे. त्यात मी हा असा, बेटावरच्या एकाकी माणसासारखा... या इथल्या बेटावर मात्र भेटलात तुम्ही, पाचजणी!! म्हणूनच मी आपलं इथल्या मुक्कामाला पाचूच बेट म्हणतो. तुम्ही पाचजणींच्या प्रेमाचा हिरवाकंच पाचू मनाच्या मखमली पेटीत जाऊन बसलाय कधीच, त्याच्याच प्रभेवर प्राण टिकून राहिलेत कुडीत. नाहीतर आता तसं सारं काही औट घटकेचच... (सोसाट्याचा वारा सुटतो)

यमू : बापरे! वादळ येतंय वाटतं !

लता : खूप मोठं वादळ येणारसं दिसतं.

गुरुजी : (काकडतात)

मीना : बापरे ! तुम्हाला तर थंडी भरलेय गुरुजी.

चिमणी : (हात लावत) तापही भरपूर चढलाय अंगात.

गुरुजी : (तापाच्या भरात) येऊ दे... येऊ दे... म्हणजे काय, एकदा का वादळ येऊन गेलं की बरं असतं. मग सगळं कसं शांत शांत आणि निर्मळ होऊन जातं. मागं एकदा असंच एक खूप मोठं वादळ आलं होतं. (विजांचा कडकडाट. सर्वजण निपचीत. वादळाचा जोर वाढत जातो. आणि त्यातच बाबा ऽऽ अशी लाडिक हाक प्रतिध्वनीसह ऐकू येते.)

गुरुजी : (ताड्कन उठत) कोण साद घालतय? कोण घालतय साद ? (पुन्हा बाबाऽऽ अशी साद) तू आलीस बेटा? तू आलीस ? कुठं आहेस तू ? कुठं ? कुठल्या उध्वस्त कौलारातून ऐकू येतेय तुझी ही साद? असशील तेथून भिरभिरत ये बेटा. खारीच्या शेपटी इतकी तुझी चिमुकली थरथर मला भरून घेऊदे माझ्या प्राणात आणि उडून जाऊदे माझ्या या देहातून

एक चिमणा हिरवागार पक्षी या पाचूच्या बेटावरचं आभाळ आपल्या पंखावर तोलीत... ह्या पाचूच्या बेटावरचं आभाळ आपल्या पंखावर तोलीत... भ्रमिष्टासारखे निघून जातात. विजांचा कडकडाट. वादळ. मुलींच्या तोंडी गाणं.)

सर्वजणी : वादळाचं वारं कसं सोसाट्यानं गेलं,
पापणीच्या तळापाशी आसवांची ओलं...
गुरुजींच्या नशिबाला कमळाचा भोग,
बेटावरी वादळाच्या खुणा जागोजाग...
गुरुजींची वाट कशी दुज्या गावी गेली,
अंगणात कोमेजल्या मोगरीच्या वेली...

(गाणं गाता गाता सर्वजणी पूर्वीप्रमाणेच अर्धवर्तुळाकृती बसतात. निश्चल, स्तब्ध होतात. वादळाचा जोर वाढत जातो. हळूहळू पडदा.)

*****